दाखल दिनांक : २१.११.२०२२

नोंदणी दिनांक : २१.११.२०२२

निकाल दिनांक : ०५.०५.२०२५

| | | | |
|---|---|---|---|
| कालावधी : | वर्षे | महिना | दिवस |
| | ०२ | ०५ | १४ |

CNR No.MHCH100008772022

**मुल, जि. चंद्रपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २) यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : स. दि. कमलाकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. १०५/२०२२** **निशाणी क्र. २९**

**प्रथम खबरी अहवालाचे विवरण**

अपराध क्रमांक – ४९७/२०२२ दिनांक – २३.१०.२०२२

पोलीस ठाणे – मुल पोलीस ठाणे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/अभियोग पक्ष | – | महाराष्ट्र शासन, द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, मुल, पोलीस ठाणे, ता. मुल, जि. चंद्रपूर.<br>फिर्यादी – सुधाकर मोतीराम बांबोळे. |
| अभियोग पक्षातर्फे | – | कु. एम. एस. जोगे, विशेष सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | – | १. अभिजीत दशरथ वाकूळकर,<br>वय– २३, धंदा– शिक्षण,<br>२. दशरथ नामदेव वाकूळकर,<br>वय– ५३ वर्षे, धंदा– शेती,<br>३. संदीप प्रकाश शिंदे,<br>वय– ३६ वर्षे, धंदा– मजूरी,<br>सर्व रा. नांदगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर. |
| विधीज्ञ | – | श्री. डी. वाय. शेख. |

| | |
|---|---|
| अपराधाचा दि. २२.१०.२०२२ | प्रथम खबरी अहवाल दि. २३.१०.२०२२ |
| आरोपपत्र दाखल दि. २१.११.२०२२ | आरोप निश्चिती दि. ०३.०३.२०२५ |
| साक्षीपूरावा सुरु होण्याचा दि.१३.०३.२०२५ | निकाल राखून ठेवल्याचा दि. ०५.०५.२०२५ |
| निकाल दि. ०५.०५.२०२५ | शिक्षेचा आदेश दिनांक – निरंक |

## आरोपींचे विवरण

| अ.क्र. | आरोपींची नावे | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | अपराध | निर्दोष मुक्तता अथवा दोषसिध्दी | ठोठावण्यात आलेली शिक्षा | संपरीक्षेदरम्यान भोगलेला कारावास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अभिजीत दशरथ वाकूळकर | अटक नाही | २१.११.२०२२ | भा.दं.वि. चे कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | दशरथ नामदेव वाकूळकर | –''– | –''– | –''– | –''– | –''– | –''– |
| ३. | संदीप प्रकाश शिंदे | –''– | –''– | –''– | –''– | –''– | –''– |

## अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| १. | सुधाकर मोतीराम बांबोळे (नि.क्र.२३) | फिर्यादी |

## बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| क्र. | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## बचाव पक्षाने मान्य केलेली कागदपत्रे

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
| --- | --- | --- |
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे निशाणी क्रमांक**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
| --- | --- | --- |
| | निरंक | निरंक |

**वस्तू**

| क्रमांक | वस्तू क्रमांक | विवरण |
| --- | --- | --- |
| | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक ०५ मे, २०२५ रोजी घोषीत)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ खालील अपराधाकरीता खटला चालविण्यात आला असून अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

२] फिर्यादी सुधाकर याने दि.२३.१०.२०२२ रोजी मुल पोलीस ठाणे येथे तोंडी रिपोर्ट दिला की, तो तिन्ही आरोपींना चांगल्या प्रकारे ओळखतो. आरोपी क्र.३ याने फिर्यादीच्या गावचा मामा तलाव मच्छी पालनासाठी लीजवर घेतला होता. उन्हाळ्यात त्याने मच्छी पकडण्यासाठी तलावाचा तुडूंब फोडून पाणी सोडले होते. त्यामुळे तलावाच्या मागील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी न मिळाल्याने त्यांचे उन्हाळी धानाचे नुकसान झाले. तसेच जनावरांनाही पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. फिर्यादीची शेती सुध्दा तलावामागे असल्याने त्याचे देखील नुकसान झाले होते. त्यामुळे त्याने व इतर शेतकऱ्यांनी त्याबाबत जिल्हा

परिषद व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार दिली असता तिची चौकशी होऊन आरोपी क्र.२ व ३ यांनी अटी व शर्तींचे उल्लंघन करुन तलावाचे पाणी सोडल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी क्र.३ याची लीज रद्द करण्यात आली होती. त्यामुळे त्याने अपील केली. दि.२०.१०.२०२२ रोजी अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती त्याबाबत फिर्यादीलाही नोटीस देवून सुनावणीला बोलाविण्यात आले होते. त्या सुनावणीच्या वेळी फिर्यादीने त्याचे लेखी बयान दिले होते.

३] घटनेच्या दिवशी सायंकाळी ७.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी हा मल्ला डंकरवार याच्या हॉटेलमध्ये बसून असताना त्याच्या गावातील प्रकाश रेगलवार व प्रफूल गद्दे यांनी आरोपी क्र.१ हा त्याला बोलवित असल्याचे सांगितले. परंतू पुर्वी फिर्यादीला त्याने जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी तिथे गेला नाही. थोड्या वेळाने तो हॉटेलमधून घरी परत जात असताना बस स्टॉप जवळील ग्राम पंचायतच्या गेटजवळ आरोपी क्र.१ याने आमची अधिकाऱ्याकडे तक्रार केली या कारणावरुन त्याला ''साला मादरचोद हा खटरा सुधाकर बांबोळे जास्त मस्तीला आला आहे, आमची तक्रार करते, तुझ्या माय बहिणीला हेपो'' अशी अश्लील शिविगाळ केली. तसेच आरोपी क्र.१ याने त्याला ''साल्याले एक दिवस मारुन तेरा दिवसांनी तेरवी करतो'' अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी तिथे आरोपी क्र.२ व ३ हे सुध्दा हजर होते. आरोपी क्र.३ याने त्याला ''तू आमच्या धंद्यामध्ये आडकाठी आणू नकोस'' अशी धमकी दिली. तसेच आरोपी क्र.२ याने त्याला ''माझी मुलगी सरपंच झाली, तेव्हापासून तू माझ्या मुलीच्या विरोधात तक्रार करतो, जो कोणी माझ्या विरोधात जाईल, मी त्याला उडवून टाकीन'' अशी धमकी दिली.

४] या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द उपरोक्त कलमांखालील अपराधांकरीता गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा तपास पोलीस हवालदार श्री. पुंडलिक परचाके यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द सकृतदर्शनी पुरावा आढळल्याने न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

५] आरोपींनी फिर्यादीस जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा त्यांच्यावर आरोपी असल्याने भा.दं.वि.चे कलम ५०६(२) लागू होतात. त्यास सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद असल्याने सदर खटला वॉरंट पध्दतीने चालविण्यात आला. त्यानंतर मी आरोपींविरुध्द नि.क्र.१७ वर उपरोक्त कलमांखालील अपराधांकरीता आरोप निश्चीत केला. जो त्यांना वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी तो नाकारला व संपरिक्षेची मागणी केली. खटला साक्षीपुराव्याला लागल्यानंतर फिर्यादी व आरोपींनी नि.क्र.२१ वर तडजोड पूरसिस दाखल केली. परंतू भा. दं. वि. कलम २९४ हे तडजोडपात्र नसल्याने ते फेटाळण्यात आले. त्यानंतर अभियोग पक्षाने फिर्यादी सुधाकर याची साक्ष (नि.क्र.२३) वर नोंदवून (नि.क्र.२४) वरील पूरसिस देवून आपला साक्षीपूरावा बंद केला. आरोपींविरुध्द पूरावा मिळून न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६] वि. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींच्या वि. विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले असून मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२२.१०.२०१९ रोजी १९.०० ते १९.३० वाजेच्या सुमारास मौजा नांदगाव येथील सार्वजनिक ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीला ''साला मादरचोद हा खटरा सुधाकर बांबोळे जास्त मस्तीला आला आहे, आमची तक्रार करते, तुझ्या माय बहिणीला हेपो'' अशा अश्लील शब्दात शिविगाळ केली, त्यामुळे इतरांना त्याचा उपद्रव झाला व त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड विधानाच्या कलम २९४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| २. | याच दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने उपरोक्त फिर्यादीला ''साल्याले एक दिवस मारुन तेरा दिवसांनी तेरवी करतो'' अशी जिवे मारण्याची धमकी देवून धाकटपटशा केला व त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड विधानाच्या कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता :</u>**

७] वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमिमांसा एकत्रितपणे करण्यात आली आहे. फिर्यादीने त्याच्या साक्षीत म्हटले आहे की, सर्व आरोपींना तो ओळखतो. ते त्याच्या गावचे आहेत. सन २०२२ साली एका दिवशी तो बस स्टॉपवरुन घराकडे जात असताना आरोपी क्र.३ संदीप याने तक्रार केली म्हणून त्याच्याशी वाद घातला होता. त्या कारणावरुन त्यांच्यात दोन–दोन गोष्टी झाल्या.

त्यावेळी आरोपी क्र.१ व २ हे तिथे होते. त्या वादामुळे त्याने रागाच्या भरात आरोपींविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली. घटनेच्या दिवशी आरोपी क्र.१ याने त्याला अश्लील भाषेत शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नसल्याचे त्याने म्हटले आहे. त्याला तोंडी रिपोर्ट दाखविला असता त्यावरील सही त्याने मान्य केली परंतू त्यातील मजकूर त्याने वाचला नव्हता.

८] त्याने अभियोग पक्षास समर्थन ने केल्याने वि. सहा. सरकारी अभियोक्त्यांनी त्याला न्यायालयाच्या परवानगीने उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्यादिवशी तो बस स्टॉप जवळ असताना आरोपी क्र.१ याने त्याला अश्लील शब्दात शिविगाळ केली तसेच त्याने त्याला ''जिवाने ठार मारतो व तेरा दिवसांनी तेरवी करतो'' अशी धमकी दिली, त्यावेळी तिथे आरोपी क्र.२ व ३ हे हजर असल्याने त्याने त्यांच्याविरुध्दही रिपोर्ट दिली इत्यादी बाबी त्याने अमान्य केल्या. त्याला तोंडी रिपोर्ट मधील रेखांकीत भाग 'अ' वाचून दाखविला असता तो त्याने पोलीसांना सांगितला नव्हता. परंतू तो त्यात का आहे याचे कारण तो सांगू शकला नाही.

९] त्याचा साक्षीपूरावा पाहता फिर्यादीतील महत्वाचा भाग सिध्द झाला नाही. घटनेच्या दिवशी त्याच्यात व आरोपींमध्ये तक्रारी केल्या या कारणाने वाद झाला होता म्हणून आरोपींविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे त्याने मान्य केले आहे. त्यामूळे घटनेच्या वेळी आरोपींनी त्यांच्यासह समान उद्देशाने फिर्यादीला अश्लील शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या या महत्वाच्या बाबी सिध्द होवून अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी देणारा मूख्य पूरावा अभिलेखावर आला नाही. फिर्यादीची आरोपींशी

तडजोड होऊन आपसातील वाद मिटल्याचे व त्याची आता त्यांच्याविरूध्द कुठलीही तक्रार राहिली नसल्याचे समोर आले आहे. तसेच फिर्यादी प्रस्तूतचे प्रकरण पूढे चालवू इच्छीत नसल्याचे त्याने म्हटले आहे.

१०] एकंदरीत अभिलेखावरील साक्षीपूरावा पाहता फिर्यादी व आरोपी यांच्यातील वाद संपूष्टात आल्याने साक्षीपूराव्याचे सखोल विवेचन करणे आवश्यक वाटत नाही. आरोपींविरुध्द लावण्यात आलेल्या कलमांमधील संपूर्ण घटक सिध्द होणारा पूरावा अभिलेखावर आला नाही. म्हणून त्यांच्याविरुध्दचा गून्हा सिध्द होत नाही. त्यामूळे या सर्व बाबी विचारात घेता त्यांची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरेल असे माझे मत आहे. या कारणास्तव मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी देत मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) सर्व आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम २९४ व ५०६ सह कलम ३४ खालील दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये दिलेली नि.क्र. २६ ते २८ वरील जामीन बंधपत्रे आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी वैध राहतील.

(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2025.05.05 17:49:20 +0530

स. दि. कमलाकर

दिनांक : ०५.०५.२०२५

२रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मुल.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : जी. डी. किटे, |
| न्यायालयाचे नाव | : प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.२) मुल. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०५.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०५.०५.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०५.०५.२०२५ |

............